स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/२०२१–२२/५२८** **दि. २२/०३/२०२२**

**प्रति,**
**मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी**
**फक्त पुणे शहर व पुणे ग्रामीण**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : लिंगभाव संवेदनशीलता 'जाणीव जागृती अभियान' अभियान उपक्रमाचा दुसरा टप्पा– प्रगत प्रशिक्षण शिबिरात स्वयंसेवक पाठवणेबाबत (फक्त पुणे शहर व पुणे ग्रामीण)**

महोदय/महोदया

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे बाया कर्वे स्त्री अभ्यास आणि संशोधन, कर्वेनगर, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने माहे नोव्हेंबर व डिसेंबर दरम्यान **लिंगभाव संवेदनशीलता विषयात 'जाणीव जागृती अभियान'** या उपक्रमाचा पहिला व प्राथमिक टप्पा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला होता. या अभियानाच्या माध्यमातून महाविद्यालयातील मुला–मुलींमध्ये लिंग–समावेशकतेविषयी जागरूकता गैरसमज दूर करणे यासाठी व्याख्याने, चर्चासत्रे, पथनाट्य, लघुपट व आयोजित केलेल्या उपक्रमांचे सर्वेक्षण इत्यादी उपक्रम राबवण्यात आले होते.

सदर उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत रासेयो स्वयंसेवकांचे प्रगत प्रशिक्षण समारोप **पुणे शहर व पुणे जिल्हा दि. २४ व २५ मार्च २०२२** रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आला आहे. याकरिता एकूण ५०० स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी **लिंगभाव संवेदनशीलता 'जाणीव जागृती अभियान' प्रशिक्षण उपक्रमाचा प्रगत टप्पा कार्यक्रमाकरिता** आपल्या महाविद्यालयातील रासेयो २ स्वयंसेवक (१ विद्यार्थी व १ विद्यार्थीनी) यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. **सदर उपक्रमात सहभागी होणाऱ्या स्वयंसेवकांची नावनोंदणी पुढील गुगलफॉर्मद्वारे करणे आवश्यक आहे. सदर कार्यशाळेकरिता उपस्थित स्वयंसेवकांची निवास व भोजन व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात आलेली आहे. सहभागी स्वयंसेवकांचा प्रवासखर्च रासेयो नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. तसेच सदर कार्यशाळेची संपूर्ण माहिती संबंधित स्वयंसेवकांच्या पालकांना देऊन त्याबाबतचे हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे. कळावे, ही विनंती.**

| क्र | स्थळ व संपर्क | जिल्हा | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरणशास्त्र सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | पुणे शहर व पुणे ग्रामीण | २४ व २५ मार्च २०२२ | स. ०९.०० वाजता | सहभागी स्वयंसेवक नावनोंदणी |
| | | | | स. १०.०० ते ०५.३० | लिंगभाव संवेदनशीलता 'जाणीव जागृती अभियान' उपक्रम प्रशिक्षण शिबिर |
| स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी नावनोंदणी लिंक : गुगल लिंक फॉर्म | https://forms.gle/ptNDoBqxRzfaCCtk8 | | | | |

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**